(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – II ISSN 2277-8063

# बचत गट आणि महिला आर्थिक सक्षमीकरण

**डॉ. संगिता राजू जामदार** ( सहाय्यक प्राध्यापक ) भा. अ. तथा भाईसाहेब सावंत अध्यापक महाविद्यालय, सावर्डे ता. चिपळूण जि. रत्नागिरी

---

**सारांश -**

सर्वसाधारणपणे पंधरा ते वीस लोकांचा किंवा महिलांचा स्वयंसहायता करण्याच्या हेतूने अनौपचारिकपणे एकत्र आलेला गट म्हणजे बचत गट होय. यालाच स्वयंसहाय्यता गट असेही म्हणतात. या अभियानाची सुरुवात 2011 मध्ये झाली पण 2016/17 नंतर हे अभियान घरोघरी पोहोचले.

आपला भारत देश जर जागतिक स्तरावर वाढत्या स्पर्धेत टिकून राहायचा असेल तर शेती, उद्योग व्यवसाय आणि शिक्षण या तिन्ही स्तरांवर आघाडीवर असणे गरजेचे आहे. या दृष्टीने वेळोवेळी शासनाकडून विविध प्रयत्न केले जातात. यापैकी उमेद मार्फत बचत गटांना प्रोत्साहन देऊन महिला व सर्व सामान्य सर्वच लोकांच्या व्यवसायवृद्धी साठी केलेला प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय आहे. बचत गट सुरू करण्यामागे शासनाचा असणारा हेतू कितपत सफल झाला हे पाहण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे. एकूणच बचत गटांना शासकीय निधी कोणते आहेत? तसेच राष्ट्रीयकृत बँका गटांना कितपत मदत करतात? आणि या मदतीमुळे महिला व्यवसायवृद्धी व महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने कोणता बदल जाणवतो इत्यादी प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने एक सर्वेक्षण करून त्याचे विश्लेषण प्रस्तुत पेपरमध्ये करण्यात आले आहे.

**प्रस्तावना -**

महिला बचत गट म्हणजे महिलांचा एक समूह जो एकत्र येऊन बचत करतो आणि आपापसात निधीची देवाण-घेवाण करतो, या गटास स्वयंसहायता गट असेही म्हणतात.

बचत गट / स्वयंसहायता समूह हा महिलांचा तसेच सर्वसामान्य लोकांना संघटित करण्यासाठी, त्यांना विकासात्मक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठीचा गट होय. यासाठी शासनाकडून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात 2011 मध्ये झाली. महाराष्ट्रात हे अभियान 'उमेद' या नावाने परिचित.

आहे.

**स्वरूप -**

खऱ्या अर्थाने 2017-18 मध्ये सुरुवातीला दारिद्रय रेषेखालील महिलाच यामध्ये सहभागी होत होत्या, परंतु पुढे प्रत्येक कुटुंबापर्यंत हे अभियान पोहोचवण्यात आले आहे. वर्धिनींच्या माध्यमातून हे अभियान घरोघरी पोहोचले.

महिला बचत गट स्थापण्यासाठी सहज सोपी पद्धत आहे. परिसरातील किमान 10 महिला एकत्र येऊन सर्वांच्या सहमतीने हाती लिहलेला प्रस्ताव देवून गट सुरू करू शकतात. गट सुरू केल्यानंतर बचतीसाठी एक विशिष्ट रक्कम व विशिष्ट वेळ ठरवून सर्वजण एकत्र जमतात. 'उमेद' कडून निश्चित दशसूत्री नुसार कामकाज केले जाते. ही दशसूत्री पुढीलप्रमाणे

१. नियमीत बैठक.
२. नियमीत बचत.
३. अंतर्गत कर्ज वितरण.
४. कर्जाची नियमित परतफेड.
५. गटाचे लेखे अद्यावत ठेवणे.
६. नियमित आरोग्याची काळजी घेणे.
७. शिक्षण विषयक जागरूकता वाढविणे.
८. पंचायतराज संस्थांबरोबर नियमित सहभाग.
९. शासकीय योजनांमध्ये नियमित सहभाग.
१०. शाश्वत उपजीविकेसाठी उपाययोजना.

वरील दशसूत्री नुसार काम करताना पहिल्याच तत्वानुसार नियमित बैठक घेणे अपेक्षित असते. बैठकीला महिला गोलाकार बसतात प्रथम प्रार्थना होते, नंतर स्वपरिचय दिला जातो व मीटिंगला सुरुवात होते. यामध्ये बचत जमा करणे, मागणीनुसार कर्ज वितरण व पूर्वी दिलेल्या कर्जाची परतफेड करणे ही प्रमुख कामे केली जातात. या सर्व व्यवहाराचा तपशील ठेवणे लेखा अद्यावत ठेवणे यासाठी गटातून तीन प्रमुख व्यक्तींची निवड केली जाते. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव असतात.

**बचत गटाचे फायदे -**

1. समाजातील सर्वसामान्य लोकांना विशेषतः महिलांच्या स्वयंरोजगार अर्थात. आर्थिक स्वावलंबनास उपयुक्त.
2. ग्रामीण आणि निमशहरी भागातील लोकांसाठी उपयुक्त.
3. उपेक्षित समुदायांना सक्षम बनविणे.
4. फक्त आर्थिक नाही तर सामाजिक विकास व व्यक्तिमत्व विकासास उपयुक्त.
5. महिलांना राष्ट्रीयकृत बँकिंग क्षेत्रातील व्यवहाराची माहिती मिळते.
6. महिलांचा कुटुंब व समाजातील दर्जा वाढत आहेत.

**वैशिष्ट्ये -**

| | |
|---|---|
| | 1. बचत गट स्थापन करताना नोंदणीची गरज नाही. |
| | 2. स्थापनेसाठी कोणतीही फी आकारली जात नाही. |
| **वै** | 3. अल्प व्याजदरावर अर्थसहाय्य. (1 किंवा 2 टक्के व्याजदर) |
| | 4. महिला व पुरुषांचे मिश्र गट असतात. |
| | 5. एका गटामध्ये किमान 10 ते 20 संख्या असते. |
| **शि** | 6. ठराविक कालावधीत एकत्र जमतात. |
| | 7. केलेली बचत व आलेल्या व्याजातून कर्ज दिले जाते. |
| | 8. लोकशाही तत्वाचा अवलंब. |
| **ष्ट्ये** | 9. उद्योजकतेला प्रोत्साहन. |
| | 10. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड. |
| | 11. सर्वांचे ध्येय समान. |
| | 12. समान बचत समान लाभ. |

वरील सर्व वैशिष्ट्ये व फायदे लक्षात घेता शासनाचा हेतू कितपत साध्य झाला आहे हे पाहण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.

**1. संशोधनाची पद्धत - सर्वेक्षण पद्धत**

**2. माहिती मिळवण्यासाठीचे साधन व तंत्र -**

माहिती मिळवण्यासाठी मुलाखत तंत्राचा वापर केला.

**3. माहितीचा स्त्रोत -**

अ. पंचायत समितीकडून नियुक्त प्रभाग समन्वयक अधिकारी यांची मुलाखत

ब. बँकेच्या शाखाधिकारी व कर्मचारी यांची मुलाखत.शासनाकडून नियुक्त अधिकारी यांची मुलाखत.

**4. नमुना निवड -**

सावर्डे, सावर्डे खुर्द व कासारवाडी या तीन महसुली गावातील 53 स्वयंसहायता गटांची अभ्यासासाठी निवड करण्यात आली.

**5. संशोधनाची उद्दिष्टे -**

1. बचत गटाचे फायदे व वैशिष्ट्ये जाणून घेणे.
2. बचत गटामार्फत महिला सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
3. महिला सशक्तिकरणाच्या दृष्टीने बँकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
4. महिलांमध्ये कर्ज परतफेडीचे प्रमाण जाणून घेणे.

**शासनाची भूमिका -**

शासनाद्वारे 'उमेद' अभियानांतर्गत स्वयंसहायता समूह स्थापना व त्याच्या व्यवस्थापनासाठी प्रभाग संघ, ग्रामसंघाची रचना केली आहे.

'उमेद'

प्रभागसंघ (उदा. जीवनज्योती)

ग्रामसंघ

(उदा. 1. एकता ग्रामसंघ सावर्डे, 2. चेतना ग्रामसंघ कासारवाडी)

आर्थिक सक्षमता हा हेतू समोर ठेवून शासनाकडून 'उमेद' मार्फत या गटांना व्यवसायवृद्धी साठी विविध निधी पुरवले जातात. यामध्ये

1. R.F. (Reserve Fund खेळते भांडवल)
2. CIF (समुदाय गुंतवणूक निधी)
3. VRF (जोखीम प्रवणता कमी करण्याचा निधी)
4. PMFME (प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया निधी)
5. PG (उपजीविका निधी)
6. CEF (Community Enterprise Fund)

गट तयार केल्यानंतर तीन महिने पूर्ण झाले की गटाला RF दिला जातो. पूर्वी ही रक्कम 15,000 होती, आता ती 30,000 करण्यात आली आहे. 'उमेद' कडून प्रभाग संघास त्यांच्याकडून ग्राम संघास व पुढे गटांना व्यवसाय वृद्धीस निधी पुरवला जातो. गेल्या पाच वर्षांमध्ये जीवनज्योती प्रभाग संघाकडून पुरवठा केलेल्या कर्जाचा तपशील पुढील प्रमाणे...

| | **2019-20** | **2020-21** | **2021-22** | **2022-23** | **2023-24** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| **कर्ज पुरवठा** | 19,20,000 | 00 | 6,20,000 | 45,000 | 3,00000 | 28,85,000 |
| **परतफेड** | 6000 | 3000 | 5,06,000 | 2,86,000 | 2,72,300 | 10,73,300 |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, मागील पाच वर्षाच्या कालावधीचा विचार करता कोरोना सारखी महामारी आलेली असतानाही स्वयंसहायता गटाचे कर्ज परतफेडी चे प्रमाण 60% ते 70% आहे.

शासनाकडून फक्त आर्थिक तरतूदच नाही तर महिला विकासासाठी विविध प्रशिक्षण वर्ग ही आयोजित केले जातात यामध्ये कुक्कुटपालन, शेळीपालन, परसबाग लागवड, पापड मसाले व्यवसाय, टेलरिंग, पार्लर असे अनेक व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन महिलांना सक्षम करण्यावर भर असतो.

पंचायत समितीकडून नियुक्त प्रभाग समन्वयक अधिकारी यांच्या मुलाखतीतून असे दिसून आले की जीवनज्योती प्रभागसंघातील बचत गटांची संख्या वाढत आहे. अगदी सुरुवातीला 2017-18 मध्ये ही संख्या 24 होती, तर 2023-24 मध्ये ही संख्या वाढून 300 च्या घरात गेली आहे.

**राष्ट्रीयकृत बँक भूमिका -**

शासनाकडून जशी आर्थिक तरतूद आहे तसेच राष्ट्रीयकृत बँकांकडूनही स्वयंसहायता गटांना व्यवसायवृद्धी साठी कर्ज पुरवठा केला जातो. हे कर्ज वितरण तीन टप्प्यामध्ये विभागीत केले आहे. यामध्ये तीन टप्पे पुढीलप्रमाणे.

| **टप्पा क्र.** | **गटाचा आढावा (corpus)** | **कर्ज रक्कम** | **व्याज दर** |
|---|---|---|---|
| 1 | 6 पट कर्ज | साधारण 1 लाख | 5.6 ते 6 % |
| 2 | 8 पट कर्ज | साधारण 3 लाख | 6 ते 6.5 % |
| 3 | 10 पट कर्ज | साधारण 10 लाख | 9 ते 10 % |

साधरण 10 ते 20 लाखांपर्यंत एका गटास कर्ज दिले जाऊ शकते. विशेष म्हणजे बँक दहा लाखांपर्यंत कर्ज पुरवठा करताना कोणतेही तारण घेत नाही. अथवा फी घेत नाही. फक्त गटातील महिलांचा प्रस्ताव घेऊन कर्ज दिले जाते. 10 ते 20 लाखांपर्यंत कर्ज घेताना वीमा उतरवण्यासाठी ठरावीक फी घेतली जाते.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया कडून मागील पाच वर्षाचा कर्ज पुरवठा केलेला तपशील पुढील प्रमाणे....

| **साल** | **गटांची संख्या** | **कर्ज पुरवठा** |
| --- | --- | --- |
| 2019-20 | 24 | 35 लाख |
| 2020-21 | 34 | 43 लाख |
| 2021-22 | 35 | 90 लाख |
| 2022-23 | 25 | 87 लाख 70 हजार |
| 2023-24 | 12 | 48 लाख 10 हजार |
| 2024-25 | 17 | 93 लाख 90 हजार |

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांशी चर्चा केली असता असे दिसून येते की कर्ज परतफेडीचे प्रमाण 96 ते 97 टक्के आहे.

**निष्कर्ष -**

1. बचत गटाचे फायदे व वैशिष्ट्ये लक्षात घेता बचत गटांची संख्या वाढत आहे
2. शासनाकडून महिला सबलीकरणाच्या दृष्टीने आर्थिक निधी तर दिला जातोच त्याचबरोबर व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रम ही राबवले जातात
3. दहा ते वीस लाख एवढ्या मोठ्या प्रमाणात बँकांकडून अल्पदरात कर्ज पुरवठा केला जातो.
4. महिलांचे बँक तसेच प्रभाग संघ व ग्रामसंघांना कर्ज परतफेडीचे प्रमाण 95 ते 97 % आहे.

**समारोप -**

वरील निष्कर्ष बघता बचत गट ही संकल्पना सफल होताना दिसत आहे. महिला बचत गटांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हे निश्चितच प्रशंसनीय बाब आहे. संख्यात्मक बरोबर गुणात्मक विकासाच्या दृष्टीने महिलांनी शासनाच्या प्रत्येक उपक्रमात उत्साहाने भाग घेतला पाहिजे. उपक्रमात भाग घेणाऱ्या महिलांची संख्या तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे, तर ती वाढली पाहिजे. स्वतःबरोबर समाजाच्या पर्यायाने देशाच्या विकासात हातभार लावला पाहिजे.

**संदर्भ..**

1 प्रेरिका आणि वर्धिनी साठी मुलभूत प्रशिक्षण पुस्तिका
2. स्वयंसहाय्यता समूहास प्राप्त होणारे निधी व मार्गदर्शक सूचना पुस्तिका
3. जीवनज्योती प्रभागसंघाचे गेल्या पाच वर्षाचे ऑडिट रिपोर्ट
https:// www.Umed.in
https://mr.wikipedia.org.wiki
https://www.drdajalgaon.com/fag.php